# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 06/10/2023 (शुक्रवार) दुपार


### घरफोडी

**पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील मौजा जाखेगाव तह मौदा येथे दिनांक ०५/१०/२०२३ चे ११.०० वा. ते १४.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– नेहा सुधीर रामटेके, वय ३० वर्ष, रा. जाखेगाव ता. मौदा ही गोपाल कंपनी येथे कामाला गेली व हिचे आई वडील शेतात कामाला गेले असता फिर्यादी ही दुपारी ३.०० वा सुमारास घरी परत आली तेव्हा घरातील दरवाजाचे लॉक लागलेले दिसले परंतु दरवाजाचा कोंडा वाकलेला दिसला जेव्हा फिर्यादीने जवळ असलेली चाबीने घराचा ताला खोलुन दरवाजा उघडुन आत प्रवेश केला असता घराचा आत मधील पलंगावर गोदरेज कपाटावर ठेवलेला दागीन्याचा स्टीलचा डब्बा व कागदपत्रे अस्ताव्यस्त पडलेले दिसले त्यामुळे फिर्यादी ही लगेच बेडरूम मध्ये गेली तर बेडरूम मधील गोदरेजचे कपाट उघडे दिसले व कपाटाचा आरसा फुटलेला दिसला व रक्ताचे डाग दिसले कपाटाचे आतील लॉक सुदधा तुटलेले दिसले व त्यामध्ये ठेवलेले आईचे १० वर्षापुर्वी बनवलेले ०३ तोळे सोन्याचे मंगळसुत्र व ०३ ग्रॅम सोन्याचे बिरे अंदाजे किंमती ६६,०००/– रू व नगदी रक्कम ४०,०००/– रू असा एकुण १०६०००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक सतिश सोनेकर पोस्टे मौदा मो. क्र. ८९७५९२१७७० हे करीत आहे.

### जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कारवाई

**पो.स्टे. देवलापार** :– अंतर्गत ०१ किमी अंतरावर मौजा पोलीस स्टेशन देवलापार हायवे क्र. ४४ येथे दिनांक ०४/१०/२०२३ चे २२.२० वा. ते २२.५० वा. दरम्यान देवलापार पोलीसांना गुप्त माहिती मिळाली की, मौजा पोलीस स्टेशन देवलापार हायवे क्र. ४४ रोडवर काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन देवलापार पोलीस पथकाने नाकाबंदी केली असता ६ चक्का आयसर क्र. UP 77 AT 4141 चा चालक आरोपी नामे– १) मोहम्मद तनविर भुरे (खान) वय ३३ वर्ष, याने आपल्या साथीदार नामे– २) मोहम्मद संजात मो. आझाद, वय २२ वर्ष, ३) आरीफ मो. रियाझ अहमद, वय २५ वर्ष रा. तिन्ही रा. इसलाम नगर बाबरपुर ता. अजितमहल जि. औरीया राज्य (उ.प्र) यांचेसह आपल्या ताब्यातील ६ चक्का आयसर क्र. UP 77 AT 4141 या वाहना मध्ये गोवंश जनावरांना अत्यंत कुर व निर्दयतेने वाहन कोंबुन आखुड दोरीने पाय व तोंड दाबुन चारा पाण्याची सोय न करता दाटीवाटीने अपुरे जागेत कोंबुन कत्तलीसाठी अवैद्यरित्या वाहतुक करून घेवुन जातांनी मिळुन आल्याने त्या गाडीतील जनावरांची पाहणी केली असता गाडीमध्ये १) ०८ नग काळे रंगाचे गोवंश बैल प्रत्येकी किंमती १५,०००/–रू प्रमाणे एकुण किंमती १,२०,०००/–रू (२) ०२ नग पाढरे रंगाचे गोवंश बैल प्रत्येकी किंमती १५,०००/–रू प्रमाणे एकुण किंमती ३०,०००/–रू (३) ०८ नग फिकट काळपट रंगाचे गोवंश बैल प्रत्येकी किंमती १५,०००/–रू प्रमाणे एकुण किंमती १,२०,०००/–रू (४) ०४ नग लाल रंगाचे गोवंश बैल प्रत्येकी किंमती १०,०००/–रू प्रमाणे एकुण किंमती ४०,०००/–रू (५) ०२ नग काळे व ०२ नग पांढरे रंगाचे गाई प्रत्येकी किंमती १०,०००/–रू प्रमाणे एकुण किंमती ४०,०००/–रू (६) ०१ नग काळे रंगाचा बैल व ०१ लाल रंगाची गाय मृत्यु झालेला प्रत्येकी किंमती ००.०० रू प्रमाणे एकुण किंमती ००.०० रू अशा एकुण ३,५०,०००/– रूपयाचे गोवंश जनावरे दिसल्याने सदर गोवंश जनावरे हे नमुद ६ चक्का आयसर क्र. UP 77

AT 4141 किंमती १२,००,०००/— रू. व यातील एकुण २६ नग जिवंत गोवंश जनावरे व ०२ नग मृत्य गोवंश जनावरे अशी किंमती अंदाजे ३,५०,०००/— रू अशा एकुण १५,५०,०००/— रूपयाचा मुद्देमाल आरोपीतांकडुन जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे— पोशी २३३९ सचिन भगवान येडकर पोस्टे देवलापार यांचे रीपोर्टवरून पोस्टे देवलापार येथे आरोपीतांविरुध्द कलम २७९, ४२९, ३४ भादंवी सहकलम ११ (१) (घ) (ड) (च) प्राण्यांना निर्दयतेने वागणूक प्रतिबंधक अधिनियम १९६० सहकलम ५ (अ) ९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९९५ सहकलम ११९ सहकलम ४/१२२, १८४ मोवाका. कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी गायकवाड मो. नं. ९९२३९८८२९२ हे करीत आहेत.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**